# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१
संगणक विभाग


जा.क्र.मनपा/संगणक/९४४/२०२२-२३ दि. 2८/6/2022

## // परिपत्रक //

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागात कामकाज अधिक तत्परतेने होण्यासाठी e-governance वापर करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेतील विविध विभागातील प्रस्ताव, खर्च, स्पीलओवर, गोषवारा, कार्यादेश, करारनामा, works Geo Tracking इतर नोंदीसाठी संगणक आज्ञावली विकसित करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.१४/०२/२०१९ रोजी मंजूरी प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेचे विविध विभागाचे प्रस्ताव, देयक, गोषवारा, करारनामा, तरतूद संगणकीकृत करणेसाठी Budget and Geo Tracking Online Processing System संगणक आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. या आज्ञावलीचे विविध विभागांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. या आज्ञावलीमध्ये मा. महासभा व मा. आयुक्त सो. यांनी मंजूर करण्यात आलेले अंदाजपत्रक (Budget), कामाचा स्पील ओवर, works Geo Tracking नोंद करण्यासाठी महानगरपालिकेच्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना User id व Password प्रदान करण्यात आलेले आहेत. या आज्ञावलीचा वापर केल्याने विविध विभागांना आपल्या अंदाजपत्रकात मंजूर तरतूद, झालेला खर्च, उपलब्ध तरतूद, प्रस्तावित कामे works Geo Tracking याबाबत अद्यावत संगणकीकृत रिपोर्ट तसेच कामाचे कार्यादेश, गोषवारा, करारनामा इ. सुविधा उपलब्ध असल्याने अंदाजपत्रकीय मंजूर तरतूदीच्या अधिन राहून काम करता येणार आहे.

या आज्ञावलीचा महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी वापर करणे आवश्यक आहे. प्रस्ताव, देयक व इतर आवश्यक तपशिल याबाबत नोंद या संगणक आज्ञावलीमध्ये केल्यानंतरच संगणकीकृत जनरेट होणारा unique id सह उपायुक्त/कार्यकारी अभियंता/शहर अभियंता, मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, अति. आयुक्त, आयुक्त यांचेकडे मंजूरीसाठी पाठविणेत यावे.

मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने

**(डॉ. संभाजी पानपट्टे)**
**अति. आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति**
**सर्व उपायुक्त**
**विभागप्रमुख (सर्व विभाग)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत**
**मा. आयुक्त सो**